ePaper **दसरा मेळाव्यासाठी 'शिवाजी पार्क'चं मैदान कोण मारणार? ठाकरे की शिंदे गट**



| वर्ष - 7 । अंक - 143 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शनिवार, दिनांक 30 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- भारताचा आशिया चषकावर सि'राज'!
- रुबिना दिलायक होणार आहे आई
- काँग्रेसला 5 राज्यांत बहुमताचा विश्वास!
- मी फडणवीसांना मदत केली : खडसे

# तो सेल्फी ठरला अखेरचा !

## » विसर्जन मिरवणुकीत आईचा हंबरडा; सहा वर्षांच्या चिमुकल्याचा टाकीत बुडून मृत्यू

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**ढोल-ताशांचा कडकडाट...गणपत्ती बाप्पा मोरयाचा गजर...डॉल्बीवर थिरकणारी तरूणाई...अशा जल्लोषी वातावरणात गुरूवारी (दि. 28) सर्व जण आपल्या लाडक्या बाप्पाच्या विसर्जन मिरवणूकीत सहभागी झाले होते. मात्र त्याच दिवशी एका आईने आपल्या मुलासाठी हंबरडा फोडला होता. पाण्याच्या टाकीत पडून आपल्या लाडक्या मुलाला गमविण्याची वेळ त्या आईवर ऐन विसर्जन मिरवणूकीत आली होती. मिरवणूकीत घटना घडत असताना त्या चिमुकल्याचा आवाज कोणाच्याच कानावर आला नाही. या घटनेची माहिती सोशल मीडीयावर व्हायरल होताना मोशी परिसरासह शहरातील नागरिकांचे हृदय हेलावून जात आहे. विसर्जन मिरवणुकीत आरव च्या आईने काढलेली सेल्फी च अरवसाठी अखेरची ठरली.**



विसर्जन मिरवणूकीत काळजी घेण्याबाबत महापालिका, पोलिस प्रशासन सातत्याने आवाहन करत होते. या आवाहना बरोबरच ठिकठिकाणी दुर्घटना होऊ नये यासाठी प्रशासकीय पातळीवर दक्षताही घेतल्या होत्या. मात्र तरीही काही अनुचित घटना घडल्या आणि नागरिकांच्या दुःखात भर पडल्याचे ऐकायला मिळाले. त्या पैकीच एक मोशीतील घटना आहे. मोशी येथील मंत्रा सोसायटीमध्ये पाण्याच्या टाकीत पडून आरव आशिष पाटील या चिमुकल्याला आपला जीव गमाविण्याची वेळ आली. सोसायटीमध्ये विसर्जन मिरवणूक सुरू असतानाच हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. मिरवणूकीत सुरू असणाऱ्या दंग्यामुळे कदाचित त्या बाळाचा आवाज कोणाच्याय कानावर पडला नसण्याची शक्यता आहे. परिणामी त्या चिमूकल्याला आपला जीव गमवावा लागला. या घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायटीधारकांकडून पाण्याची टाकी किंवा वीज जनरेटर व्यवस्था, एसटीपी, वीजेची उपकरणे आदी ठिकाणी लहान मुलांचा वावर होवू नये, याची काळजी घेण्याबाबत आवाहन केले जात आहे.

### सोशल मीडियावर व्यक्त होतेय हळहळ

» आरव आणि त्याच्या आईचा सेल्फी घेतलेला फोटो शहरात विविध सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. घडलेल्या घटनेचा उल्लेख त्यामध्ये देण्यात आला आहे. आरवला आदरांजली वाहताना अनेकांकडून हळहळ व्यक्त होत आहे. तसेच लहान मुलांची काळजी घेण्याबाबत आवाहन केले जात आहे.

# गणेशोत्सव देखाव्यातून विद्यार्थ्यांना उमगले 'जी-20' महत्त्व

## » 'गायत्री इंग्लिश मीडिअम स्कूलचा अनोखा देखावा

### » संस्थापक अध्यक्ष विनायक भोंगाळे यांची संकल्पना

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारताने नेतृत्व केलेल्या 'जी-20' परिषदेचे चित्रण व महत्त्व गणेशोत्सव देखाव्यातून गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलने उभारले. या परिषदेतून जागतिक स्तरावर भारताचा नावलौकिक कसा झाला? या देखाव्यातून विद्यार्थ्यांमध्ये जी-20 बाबत जनजागृती करण्यासाठी स्कुलने पुढाकार घेतला. या देखाव्याचे पालकवर्गात कौतुक होत आहे.**



गायत्री इंग्लिश मीडियम शाळेचे संस्थापक अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या पुढाकाराने विशेष उपक्रमाचे आयोजन केले जाते. शाळेमध्ये केवळ पुस्तकी शिक्षण न देता व्यवसायिक शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. त्या दृष्टीकोनातून यंदा गणेशोत्सवात जी- 20 ही संकल्पना ठेवली होती. यामध्ये समाविष्ठ असणाऱ्या सर्व देशाचे ध्वज लावण्यात आले होते. त्या संबंधित सर्व माहिती लावण्यात आली. सर्व शिक्षकांना ही माहिती वर्गात देवून त्या विषयावर लिखान करुन देण्यास सांगून स्पर्धा घेण्यात आली. या उपक्रमाचे संस्थाचे अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच सेक्रेटरी, व्यवस्थापकीय संचालक, विश्वस्थ, विशेष कार्यकारी अधिकारी यांनी कौतुक केले. जी-२० हा जगातील २० प्रमुख देशांच्या अर्थमंत्री व मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नरांचा एक गट आहे. वास्तविकपणे या गटात १९ देश व युरोपियन संघाचा सहभाग आहे. युरोपीय परिषदेचे अध्यक्ष व युरोपीय मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष युरोपियन संघाचे जी-२० मध्ये प्रतिनिधित्व करतात. जी-२० सदस्य देशांचा एकत्रित जीडीपी जगाच्या ८५ टक्के आहे व हे २० देश एकूण जागतिक व्यापाराच्या ७५ टक्के व्यापारासाठी कारणीभूत आहेत. 2008च्या सुरुवातीच्या बैठकीपासून जी -20 देशांच्या प्रमुखांनी ठरावीक कालावधीत परिषदेत वेळोवेळी सहभाग घेतला आहे. अलिकडच्या वर्षांत आपल्या कार्यसूचीच्या विस्तारामुळे या गटामध्ये वित्त मंत्री आणि परराष्ट्र मंत्र्यांची स्वतंत्र सभा देखील आयोजित केली जातात.

> इंडोनेशियातील बाली शिखर परिषदेत दि. 1 डिसेंबर 2022 रोजी भारताला जी-20 समिट इंडिया 2023 चे अध्यक्षपद देऊ करण्यात आले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भारतातील कार्यक्रमाचे अध्यक्षपद सोपवण्यात आले. भारताने या कार्यक्रमाचे आयोजन करून जगात आपली ताकद सिद्ध केली. त्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी. त्यांना त्याचे महत्त्व कळावे. याकरिता जी-20 चा देखावा केला. यावर्षी गणेशोत्सव अत्यंत दिमाखात साजरा झाला.
>
> **- विनायक भोंगाळे,**
> **संस्थापक अध्यक्ष, गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल. भोसरी.**

# पुण्यात पावसाचा धुमाकूळ!

## » सिंहगड रस्त्यावर धोकादायक स्थिती अनेक घरात पाणी

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणे गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दरम्यान पुणे आणि मुंबईत जोरदार पावसाने हजेरी लावली. पुण्यात तर पावसाने धुमाकूळ घातला. पुण्यातील कोथरूड, कर्वेनगर, सिंहगड रस्ता, धायरी, वारजे, माळवाडी, सूस, बावधन यासह इतर भागात झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच त्रेधा तिरपीट उडाली. कोथरूड परिसरातील अनेक सोसायट्या, घरांमध्ये पाणी शिरले आहे.**



### बचाव कार्य सुरू : पालकमंत्री

» कोथरूड परिसरात असलेल्या प्रतिज्ञा मंगल कार्यालय आणि आसपासचा परिसर जलमय झाला आहे. काल दुपारी चार नंतर शहरात पावसाला सुरुवात झाली. कात्रज, आंबेगाव, धायरी, नऱ्हे, खडकवासला, वारजे, माळवाडी, कर्वेनगर, कोथरूड, सुस, बावधन या भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली. पावसाला सुरूवात होताच अवघ्या काही मिनिटातच रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. सिंहगड रस्त्यावर वडगाव पूल, पाटील हॉस्पिटल, इनामदार चौक येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडून गेली होती. त्यातच आयुक्त विक्रमकुमार हे टिळक चौकात मानाच्या गणपतीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तेथून घटनास्थळी धाव घेतली.

त्यामुळे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. तसेच प्रशासनाचे सर्व परिस्थितीवर बारीक लक्ष असून बचाव कार्य सुरू आहे. कोथरूड परिसरात असलेल्या प्रतिज्ञा मंगल कार्यालय आणि आसपासचा परिसर जलमय झाला आहे. काल दुपारी चार नंतर शहरात पावसाला सुरुवात झाली. कात्रज, आंबेगाव, धायरी, नऱ्हे, खडकवासला, वारजे, माळवाडी, कर्वेनगर, कोथरूड, सुस, बावधन या भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली. पावसाला सुरूवात होताच अवघ्या काही मिनिटातच रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. सिंहगड रस्त्यावर वडगाव पूल, पाटील हॉस्पिटल, इनामदार चौक येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडून गेली होती. त्यातच आयुक्त विक्रमकुमार हे टिळक चौकात मानाच्या गणपतीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तेथून घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी तुंबल्याने रस्त्यावरील वाहने बंद पडली. त्यामुळे वाहतूकीस आणखीनच अडथळा निर्माण झाला. पाण्याला प्रचंड प्रवाह असल्याने सिंहगड रस्त्यावर धोकादायक स्थिती निर्माण झालेली होती. सुदैवाने पावसाचा जोर कमी झाल्याने आता रस्त्यावरील पाण्याचा निचरा होत आहे. प्रशासनाने तत्काळ हालचाली करत रस्त्यांवर तुबलेले पाणी कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. दरम्यान संपूर्ण परिस्थितीची माहिती घेत पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रशासनाला योग्य त्या सूचना केल्या आहेत. तातडीने सर्व मतद कार्य करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. आयुक्तांनी स्वतः कोथरूडमध्ये जाऊन सर्व पाहणी केली व प्रशासनाला वेगाने काम करण्यासाठी कामाला लावले. रात्री साडेआठच्या सुमारास या भागातील स्थिती नियंत्रणात आली. आयुक्त विक्रम कुमार म्हणाले की, 'मुसळधार पावसामुळे शहराच्या वेगवेगळ्या भागात पाणी जमा झालेले आहे.

# वीजबिलांच्या थकबाकीमुळे वीज पुरवठा खंडित!

## » संतप्त ग्राहकांनी महावितरणच्या 2 महिला कर्मचाऱ्यांना डांबले

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**वीजबिलांच्या थकबाकीमुळे वीज पुरवठा खंडित केल्याच्या रागातून डेक्कन येथील दोघांनी महावितरणच्या दोन महिला तंत्रज्ञांना सुमारे दोन तास डांबून ठेवले. अंगावर कुत्रे सोडले. शेवटी पोलिस दाखल झाल्यानंतर त्यांनी या महिला कर्मचाऱ्यांची सुटका केली. याप्रकरणी दोन्ही आरोपीविरुध डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

याबाबत माहिती अशी की, डेक्कन उपविभाग अंतर्गत महिला तंत्रज्ञ करुणा आढारी व रूपाली कुटे प्रभात रोड परिसरात थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे शासकीय कर्तव्य बजावत होत्या. दरम्यान सरस्वती अपार्टमेंटमधील वीजग्राहक आरती ललित बोदे यांच्याकडे 5 हजार 206 रुपयांची थकबाकी असल्याने त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर ग्राहकाकडून तात्काळ वीजपुरवठा सुरु करण्यास ऑनलाइन वीजबिल भरण्यास नकार देण्यात आला व धनादेश स्वीकारण्यास सांगण्यात आले. मात्र आम्हाला स्वतः धनादेश स्वीकारता येत नाही असे या महिला तंत्रज्ञांनी सांगितल्यावर आरती बोदे व ललित बोदे यांनी त्यांना शिविगाळ सुरु केली. नाईलाजाने या महिला तंत्रज्ञ तिसऱ्या मजल्यावरून खाली जाण्यास निघाल्या असता त्यांना लिफ्टमधून जाण्यास



मज्जाव करण्यात आला. त्यानंतर त्या जिन्यातून जात असताना बोदे व वॉचमनकडून जिन्याचे सेफ्टी डोअर बंद करण्यात आले. त्यामुळे या दोघी तंत्रज्ञ जिन्यात अडकल्या. त्याचवेळी त्यांच्यावर दोन कुत्रे सोडण्यात आले. कुत्रे त्यांच्यावर भूंकत असताना आढारी व कुटे यांनी तात्काळ महावितरणच्या कार्यालयात व पोलिस ठाण्यात संपर्क साधला. या प्रकारानंतर महावितरणचे स्थानिक कार्यालयातील अभियंते व अनेक कर्मचारी या इमारतीमध्ये आले. त्यांनी डांबून ठेवलेल्या दोन्ही महिला कर्मचाऱ्यांना सोडण्याची विनंती केली. मात्र त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान माहिती मिळाल्यानंतर पोलीस तातडीने दाखल झाले व या दोन्ही महिला तंत्रज्ञांची सुटका करण्यात आली. दरम्यान सरस्वती अपार्टमेंटमधील वीजग्राहक आरती ललित बोदे यांच्याकडे 5 हजार 206 रुपयांची थकबाकी असल्याने त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर ग्राहकाकडून तात्काळ वीजपुरवठा सुरु करण्यास ऑनलाइन वीजबिल भरण्यास नकार देण्यात आला व धनादेश स्वीकारण्यास सांगण्यात आले. याप्रकरणी महावितरणकडून करण्यात आलेल्या तक्रारीनंतर डेक्कन पोलिस ठाण्यात आरोपी ललित बोदे व आरती ललित बोदे विरुद्ध भादंवि 353, 341, 342, 504, 34, महाराष्ट्र पोलिस अधिनियम 106 व 117 नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

### महिलांनी केली शिवीगाळ

» मात्र आम्हाला स्वतः धनादेश स्वीकारता येत नाही असे या महिला तंत्रज्ञांनी सांगितल्यावर आरती बोदे व ललित बोदे यांनी त्यांना शिविगाळ सुरु केली. नाईलाजाने या महिला तंत्रज्ञ तिसऱ्या मजल्यावरून खाली जाण्यास निघाल्या असता त्यांना लिफ्टमधून जाण्यास मज्जाव करण्यात आला. त्यानंतर त्या जिन्यातून जात असताना बोदे व वॉचमनकडून जिन्याचे सेफ्टी डोअर बंद करण्यात आले. त्यामुळे या दोघी तंत्रज्ञ जिन्यात अडकल्या. त्याचवेळी त्यांच्यावर दोन कुत्रे सोडण्यात आले. कुत्रे त्यांच्यावर भूंकत असताना आढारी व कुटे यांनी तात्काळ महावितरणच्या कार्यालयात व पोलिस ठाण्यात संपर्क साधला.

# केंद्र प्रमुखांना शिक्षण विभागाचा दिलासा!

## पदोन्नतीसाठी वय, गुणांची अट रद्द; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण विभागातील केंद्र प्रमुखांच्या भरतीसाठी 50 वर्षे वयोमर्यादा आणि 50 टक्के गुणांची ठेवलेली अट रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे या भरतीपासून वंचित राहणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तर ही जाचक अट रद्द व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी शिक्षण मंत्र्यांसह संबंधीत अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. त्याला अखेर यश आले आहे.**




> केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित परीक्षा व पदोन्नती बाबत आज सुधारित शासन निर्णय निर्गमित झाला आहे. याकामी महाराष्ट्र राज्य पदवीधर शिक्षक संघटनेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू होता. तसेच मंत्रालय आणि प्रशासकीय पातळीवर भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने पाठपुरावा सुरू होता. दोन्हीच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.
>
> – **मनोज मराठे,** राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना..

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत 5 जून 2023 रोजी केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी जाहिरात निर्गमित झाली आहे. केंद्रप्रमुख पदे ही पदोन्नतीने कार्यरत प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांमधून सेवाज्येष्ठता 50 टक्के व मर्यादित विभागीय परिक्षेने 50 टक्के भरण्याच्या अनुषंगाने निर्णय घेतला होता. परंतु गेल्या 79 वर्षात ही पदे कोणत्याच पद्धतीने न भरल्याने आता परीक्षेसाठी कमाल 50 वर्षे वयोमर्यादा व पदवीला 50 टक्के गुणांची अट ठेवल्याने अनेक सेवाज्येष्ठ, अनुभवी, राज्य राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक पात्रता असूनही केंद्रप्रमुख विभागीय परीक्षेला बसण्यापासून वंचित राहणार होते. या निर्णयाबाबत राज्यातील शिक्षकांमध्ये नाराजी होती. शिवाय कोविड मध्ये दोन वर्षे गेल्याने अनेकांची वयोमर्यादा ओलांडल्याने परीक्षा देता आल्या नाही. या बाबत महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने समान न्याय समान संधी या तत्वानुसार राज्य सरकारकडे मागण्यांसाठी निवेदन देण्यात आली होती. सर्व शिक्षकांना परीक्षेतून गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी संदर्भीय 1 च्या नमूद परीक्षेला बसण्यासाठीच्या पात्रता निकषातील वयाची अट रद्द करावी. परीक्षेला पदवीच्या 50 टक्के गुणांची अट नसावी. विषयानुसार केंद्रप्रमुख भरती अट रद्द करावी. राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्रशासनाला पदोन्नतीची 50 टक्के रिक्त केंद्रप्रमुख पदे तातडीने भरण्यासाठी आदेश निर्गमित करण्याची मागणी केली होती.

तसेच, या बाबत आमदार महेश लांडगे यांनी देखील शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे 1 जून 2013 रोजी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला होता. आ. लांडगे यांनी निवेदनात नमूद केले होते की, केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरील जाहिरात ही शासनाने घेतलेल्या मर्यादित विभागीय परिक्षेच्या माध्यमातून 50 टक्के पदे भरण्याच्या अनुषंगाने आहे. परंतु परीक्षेसाठी पात्रता निकष म्हणून कमाल 50 वर्षे वयोमर्यादा व पदवीला 50 टक्के गुणाची अट ठेवल्याने अनेक सेवाज्येष्ठ, अनुभवी, राज्य / राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक पात्रता पास असूनही केंद्रप्रमुख विभागीय परीक्षेत बसण्यापासून वंचित राहणार आहेत. राज्यातील शिक्षक वर्गात प्रचंड नाराजी आहे. गेल्या वर्षात ही पदे पदोन्नती व परीक्षा अशा कोणत्याच पद्धतीने न भरल्याने तसेच कोविड 19 महामारीच्या संकटामुळेही केंद्रप्रमुख भरती प्रक्रिया लांबली असल्याने परीक्षेतून गुणवता सिद्ध करण्याची संधी व पात्रता असतानाही ती संधी वेळीच मिळाली नाही. वयोगटाच्या मर्यादिमुळे या शिक्षकांवर अन्याय होणार असल्याचे वास्तव आहे.

त्यामुळे केंद्रप्रमुख भरतीसाठी सर्व शिक्षकांना परीक्षेतून गुणवता सिद्ध करण्यासाठी परीक्षेला बसण्यासाठीच्या पात्रता निकषातील वयाची अट रद करावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली होती. तसेच परीक्षेला पदवीच्या 50 टक्के गुणांची अट रद्द करावी व विषयानुसार केंद्रप्रमुख भरती अट रद्द करण्याचे आदेश देऊन राज्यातील शिक्षकांना समान संधी उपलब्ध करून द्यावी. तसेच राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्रशासनाला पदोन्नतीची 50 टक्के रिक्त केंद्रप्रमुख पदेही कालमर्यादित भरण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली होती. त्या मागणीला अखेर यश आले.

# पिंपरी-चिंचवड : विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू : डॉ कीर्ती धारवाडकर

## एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये शैक्षणिक वर्षाचा 'आरंभ'

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शैक्षणिक संस्थेचे ध्येय असावे. विद्यार्थ्यांनी स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवताना देशाचा विकास करावा असे, आवाहन एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी केले.**



निगडी येथील पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये नवीन शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा 'आरंभ २०२३' स्वागत समारंभ आयोजित केला होता. यावेळी डॉ. धारवाडकर यांनी मार्गदर्शन केले. विविधता आणि सर्व समावेशक नेतृत्व या विषयावरील चर्चासत्रा मध्ये भरत ओसवाल, उत्कर्षा राजेपांधरे, वैष्णवी देशपांडे यांनी महिला सशक्तिकरण आणि नेतृत्वगुण याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एस. बी. पाटील मधील यशस्वी माजी विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मिथिलेश कुलकर्णी, अभिषेक राव, अनुजा कुलकर्णी, सुयोग ठाकरे, अश्विनी महाबळ, साहिल सावळे या माजी विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना त्यांचा एमबीए मधील प्रवास, स्वप्न आणि यशस्वी होण्याचा राजमार्ग सांगितला. डॉ. जयश्री फडणवीस आणि पराग औटी यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, मनोधैर्य, वर्तणूक, नेतृत्व गुण याविषयी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. रवी बोदाणी, संजय बोदाणी, प्रो. डॉ. दिनेश गुप्ता, डॉ. शितलकुमार रवंदळे, अंबिका मसालेच्या संचालिका कमल परदेशी, अजित चीगतेरी, संतोष घाटपांडे, भूषण हेर्लेकर, मधुरा कांबळे, सुभेदार चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक दिगपाल लांजेकर, अभिनेते समीर धर्माधिकारी, अभिनेत्री नुपूर दैठणकर मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आरंभ २३ या स्वागत पर तीन दिवसीय कार्यक्रमांमध्ये प्रथम वर्ष एमबीएच्या २४० विद्यार्थ्यांना विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त आणि पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, डॉ. कीर्ती धारवाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# १ ऑक्टोबर रोजी 'एक तास स्वच्छतेसाठी' उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे; आयुक्त शेखर सिंह

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत झालेल्या विविध मोहिमांमध्ये पिंपरी चिंचवड शहरवासियांनी सहभाग घेऊन स्वच्छतेचा संदेश कृतीत रुजविला आहे. प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण होऊन त्यात सातत्य रहावे यासाठी शहरातील सर्व आस्थापना, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, विद्यार्थी, मंडळे, गृहनिर्माण संस्था आणि नागरिकांनी 'स्वच्छता हीच सेवा' या राष्ट्रीय अभियानांतर्गत दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत शहरात विविध ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या 'एक तास स्वच्छतेसाठी' या उपक्रमात स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

येत्या रविवारी १ ऑक्टोबर रोजी शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये 'एक तास स्वच्छतेसाठी' उपक्रम राबविला जाणार आहे. यामध्ये नागरी सहभागातून कचरा संकलनाच्या व्यापक मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या नियोजन आणि व्यवस्थापनाबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी आज विविध विभागांसमवेत आढावा बैठक घेतली. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पार पडली, यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, उप आयुक्त अजय चारठाणकर, सह शहर अभियंता डॉ. ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शीतल वाकडे, उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, विजयकुमार काळे, नितीन निंबाळकर, राजेंद्र शिंदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्यासह सहाय्यक आरोग्य अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# युक्रेनची नवी ‘आघाडी’..!






**क्रिमिया या रशियाव्याप्त युक्रेनी प्रांताच्या सागरी क्षेत्रात, विशेषत: सेवास्टोपोल बंदर परिसरात युक्रेनने अलीकडच्या काळात तिखट हल्ले आरंभले आहेत. सध्याच्या घडीला युक्रेनचे पाच प्रांत पूर्णत: वा बहुतांशत: रशियाच्या ताब्यात आहेत.**

क्रिमिया, डॉनेत्स्क, लुहान्स्क, खेरसन, झापोरिझ्झिया. यांपैकी क्रिमिया प्रांतावर रशियाने २०१४ मध्येच लुटुपुटीच्या सार्वमताच्या आधारे अंमल लादला. लुहान्स्क आणि डॉनेत्स्क प्रांतांच्या काही भागांचा ताबा रशियाधार्जिण्या बंडखोरांनी त्यानंतरच्या काळात घेतला. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी याच दोन प्रांतांना रशियाशी जोडून घेण्याच्या प्रधान उद्दिष्टापायी रशियाने युक्रेनवर अनेक आघाडय़ांवरून हल्ला केला.

पण क्रिमियाच्या वेळी दाखवलेली उदासीनता या वेळी मात्र युक्रेनने दाखवली नाही आणि रशियाला तोडीस तोड प्रत्युत्तर देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या नेतृत्वामुळेच कीएव्ह हे राजधानीचे शहर, तसेच आणखी काही महत्त्वाची शहरे रशियाच्या हातात पडली नाहीत. यात महत्त्वाचा भाग म्हणजे युक्रेनचा प्रतिकार जिवंत राहिला. या प्रतिकाराला प्रतिहल्ल्यामध्ये परिवर्तित करण्याची झेलेन्स्की यांची महत्त्वाकांक्षा आहे. तिला आतापर्यंत मर्यादित यशच मिळू शकले.

रशियाच्या जोखडातून क्रिमियासह युक्रेन मुक्त करण्याची ही योजना दीर्घ काळ सुरू राहील अशीच चिन्हे आहेत. परंतु असे असतानाही युक्रेनचे प्रतिहल्ले थांबलेले नाहीत आणि रशियाच्या काळय़ा समुद्रातील आरमाराच्या मुख्यालयावरील – सेवास्टोपोल – २३ सप्टेंबर रोजीचा हल्ला युक्रेनची प्रहारक्षमता तसेच हिमतीचा निदर्शक आहे. या हल्ल्यामध्ये रशियन नौदलाचे अनेक अधिकारी आणि काळय़ा समुद्रातील रशियन आरमारप्रमुखाचा मृत्यू झाल्याचा दावा युक्रेनने केला आहे. आरमारप्रमुखाच्या मृत्यूविषयी दोन्ही बाजूंकडून दावे-प्रतिदावे सुरू आहेत. मात्र अशा प्रकारे रशियाच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील तळावर हल्ला करून युक्रेनने इरादे दाखवून दिले आहेत.

इतर कोणत्याही प्रांतापेक्षा क्रिमिया हा युक्रेनचा प्रांत रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा ठरतो. या प्रांताला रशियाशी जोडणारा केर्श पूल हा अत्यंत मोक्याचा आहे. या पुलालाही काही महिन्यांपूर्वी युक्रेनने लक्ष्य केले होते. झापोरिझ्झिया आणि डॉनेत्स्क या दोन प्रांतांमध्ये युक्रेनने दोन प्रतिहल्ला आघाडय़ा उघडल्या आहेत. पण त्यांचा रेटा रशियन बचाव मोडून काढण्याइतपत शक्तिशाली ठरू शकलेला नाही. परंतु क्रिमियामध्ये रशियन युद्धसामग्री आणि प्रतिष्ठेचे अतोनात नुकसान करणारे काही हल्ले युक्रेनने केले आहेत. काळय़ा समुद्रात गतवर्षी मोस्कवा ही रशियन युद्धनौका युक्रेनच्या तुलनेने प्राथमिक क्षेपणास्त्राने बुडवली. तेव्हापासून किमान नौदल आघाडीवर तरी आणखी अप्रतिष्ठा होऊ नये, याची खबरदारी रशिया घेत होता. पण युक्रेनने आता नव्याने रशियन आरमाराला लक्ष्य करून एक प्रकारे नवी आघाडीच उघडली आहे. काळय़ा समुद्रातील जहाजवाहतुकीसंबंधी करारातून रशियाने माघार घेतल्यामुळे हा संपूर्ण टापू धान्य, खनिजे आदी जीवनावश्यक वस्तूंच्या व्यापारासाठी असुरक्षित बनला. त्यामुळे युक्रेनने पर्यायी जलमार्गाचा वापर सुरू केल्यामुळे आफ्रिका-आशियातील देशाला युक्रेनकडून होणारी मालवाहतूक सुरळीत होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर क्रिमियातील रशियन नौदलावर केलेले हल्ले युक्रेनचा आत्मविश्वास वाढवणारे ठरतात.

## संपादकीय »

## मुक्तीचा आनंद

***लखनौच्या संभाव्य विज्ञान परिषदेत नद्यांच्या पाण्याची आंतरिक स्वच्छता, आण्विक होरपळीवर गोमय लेप अशा वैश्विक विषयांवर मार्गदर्शन होईल अशी अनेकांस आशा होती....***

विज्ञान, वैज्ञानिकता आणि छद्मविज्ञान यांच्या बेमालूम सरमिसळणीच्या काळात ‘इंडियन सायन्स काँग्रेस’ची परंपरा देदीप्यमान म्हणावी अशी आहे. सुमारे १०८ वर्षांपूर्वी १९१४ साली कोलकाता येथे ‘साहेबा’च्या अमलाखाली या वार्षिक मेळाव्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. तत्कालीन रसायनशास्त्रज्ञ जे. एल. सिमोनसेन आणि पी. एस. मॅकमोहन हे दोन प्राध्यापक या परिषदेचे जनक. त्यातून १९१४ साली कोलकाता या ब्रिटिश अमलाखालील राजधानीसदृश शहरातील ‘एशियाटिक सोसायटी’त या काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले. तेव्हाच्या कोलकाता विद्यापीठाचे कुलगुरू आशुतोष मुखर्जी या पहिल्या मेळाव्याचे अध्यक्ष होते. उद्घाटनाचे वर्ष असूनही शंभराहून अधिक वैज्ञानिक आणि विज्ञानाभ्यासक या परिषदेस हजर होते. त्यानंतर दर वर्षी अशी परिषद भरत गेली.

**मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांना दहा हजारांपेक्षा जास्त रक्कम सोबत बाळगता येणार नाही या निर्णयाच्या वर्षपूर्तीनिमित्त कामकाजात नेमकी कोणती सुधारणा झाली याचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठांच्या सूचनेवरून एक समिती नेमण्यात आली. त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे खालीलप्रमाणे होती.. समितीच्या असे निदर्शनास आले की, सर्वच विभाग व त्यांच्या ठिकठिकाणी विखुरलेल्या कक्षांत फायली तुंबण्याचे प्रमाण वाढले आहे.**

## मर्यादा 25 हजार करून टाका!

टेबलांवर ढीग लागल्याने खुर्चीत बसलेला कर्मचारीसुद्धा दिसत नाही. प्रवेशावरील निर्बंधांमुळे विशिष्ट विभागात येणारे अभ्यागत कामेच होत नसल्याने दिवसभर घुटमळताना आढळले. परिणामी गर्दी वाढली. या निर्णयाच्या आधी मंत्रालयातील बाबू एकदा कार्यालयात आल्यावर दिवसभर बाहेर पडायचे नाहीत. आता त्यांचे बाहेर पडण्याचे प्रमाण कमालीचे वाढले असून मंत्रालयाच्या आजूबाजूच्या हॉटेलांत गर्दी दिसू लागली आहे. त्यामुळे मंत्रालयातील उपाहारगृहाचा तोटा कमालीचा वाढला आहे. आधी अभ्यागत व सरकारी बाबूंमध्ये वाद किंवा भांडणे होत नसत. आता कामावरून वाद वाढले असून गेल्या वर्षभरात अनेक वेळा पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. मंत्रालयात शिरल्यावर अभ्यागतांना ‘योग्य’ मार्ग दाखवणारे कर्मचारी वगळता इतरांची चिडचिड वाढल्याचे दिसून आले आहे. आधी मंत्रालयातील विविध कक्षांत पूजा-अर्चा होत, टेबलावर देवदेवतांच्या तसबिरी असत. आता प्रायोजकत्वाच्या



अडचणीमुळे त्यातही घट झाली आहे. विशिष्ट हेतूने का होईना पण रात्री उशिरापर्यंत कार्यालयात बसून फायली हातावेगळय़ा करण्याच्या कर्मचाऱ्यांच्या वृत्तीत आता बदल झाला असून, बरोबर सव्वासहाच्या ठोक्याला ते मंत्रालय सोडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सायंकाळच्या लोकलमधील गर्दी वाढल्याने या सेवेवर ताण पडत असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. कार्यालयातील संगणकांवर आभासी चलनाबाबतची माहिती जाणून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत पाचपट वाढ झाली असून जेवणाच्या सुटीत बहुसंख्य लोक याची माहिती धुंडाळत असतात, असे माहिती व तंत्रज्ञान खात्याच्या पाहणीत आढळले आहे. ‘मोक्याच्या ठिकाणी’ काम करणारे कर्मचारी कार्यालय वेळेत सोडत असले तरी अभ्यागतांना बाहेर भेटून रात्री उशिरा घरी जातात व दुसऱ्या दिवशी ‘लेट’ कार्यालयात येतात असेही एका पाहणीत दिसून आले. निर्णयाच्या अंमलबजावणीवरून अनेक आमदार व काही मंत्र्यांची मते जाणून घेतली असता त्या सर्वांनी आमच्याकडे येणाऱ्या अभ्यागतांची गर्दी पूर्वीपेक्षा वाढली व कामेच होत नाहीत अशा तक्रारीही वाढल्याची माहिती दिली. आता कामे होत नसल्याने त्यांच्या थांबण्याची व्यवस्था करावी लागत असल्याचे यापैकी काहींनी सांगितले. एकूणच एरवी चैतन्यमय असलेले मंत्रालयातील वातावरण आता सुतकी झाल्याचे समितीला आढळले. हा निरीक्षणवजा अहवाल सहाव्या मजल्यावरील प्रमुखांच्या समोर गेल्यावर ‘आता काय करायचे’ यावर खल सुरू झाला. तेव्हा तिथेच बसलेला प्रमुखाचा एक सहकारी उद्गारला ‘१०ची मर्यादा २५ हजार करून टाका.’ हे ऐकून सारेच हास्यकल्लोळात बुडाले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजितदादा - भुजबळ यांच्यात खडाजंगी!

## » ओबीसींच्या आकडेवारीवरून बैठकीतच 'राष्ट्रवादी'चे नेते भिडले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ओबीसी आकडेवारीच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात आज जोरदार खडाजंगी झाली. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आज सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित बैठकीतच दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार वाद झाल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे.**

भुजबळांनी मांडलेल्या आकडेवारीवर अजित पवारांनी आक्षेप घेतला. आकडेवारी खरी असेल, तर दाखवून द्या, असे थेट आव्हानच अजित पवारांनी भुजबळांना केले. त्यामुळे बैठकीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात सह्याद्रीवर सर्वपक्षीय आणि काही संघटनांसह बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ओबीसी नेते म्हणून छगन भुजबळ हजर होते. यावेळी इतर मुद्द्यांवर चर्चा सुरू असताना छगन भुजबळ यांनी मंत्रालयातील ओबीसी कर्मचाऱ्यांचा मुद्दा मांडला. छगन भुजबळ यांनी मंत्रालयात ओबीसी कर्मचाऱ्यांसाठी फक्त 8 टक्के आरक्षण असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी आकडेवारीही संपूर्ण माहिती सादर केली. छगन भुजबळ यांनी मंत्रालयीन कर्मचाऱ्यांसंबंधी सादर केलेल्या आकडेवारीवर अजित पवारांनी आक्षेप घेतला. मंत्रालयात ओबीसी कर्मचारी 8 टक्के असल्याची आकडेवारी खरी नसून, जास्त कर्मचारी आहेत, असा दावा त्यांनी केला. ही माहिती साफ चुकीची आहे. ही माहिती खरी असेल तर भुजबळांनी याबाबतचे पुरावे दाखवावे, असं अजित पवार बैठकीत म्हणाले. यानंतर पुन्हा दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे बैठकीत काही क्षणासाठी तणावाचं वातावरण निर्माण झालेलं बघायला मिळालं होत. दरम्यान ओबीसीच्या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन मोठे नेते आपापसात भिडल्याने चर्चा सद्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, या बैठकीत सरकारने ओबीसी नेत्यांना महत्त्वाचा शब्द दिला. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिलं जाणार नाही, असं सरकारने ओबीसी नेत्यांना आश्वासन दिले आहे. ज्यांच्या जुन्या कागदपत्रांमध्ये कुणबी असा उल्लेख असेल त्यांनाच संबंधित प्रमाणपत्र दिलं जाईल, असे सरकारने सांगितल्याची माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील येत्या काळात काय भूमिका घेतात? ते पाहणं देखील तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. मराठा आरक्षणाच्या विषयवर शासनाने सर्वपक्षीय नेत्यांना बैठकीस बोलविले होते



### सह्याद्रीवर सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन

» ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात सह्याद्रीवर सर्वपक्षीय आणि काही संघटनांसह बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ओबीसी नेते म्हणून छगन भुजबळ हजर होते. यावेळी इतर मुद्द्यांवर चर्चा सुरू असताना छगन भुजबळ यांनी मंत्रालयातील ओबीसी कर्मचाऱ्यांचा मुद्दा मांडला. छगन भुजबळ यांनी मंत्रालयात ओबीसी कर्मचाऱ्यांसाठी फक्त 8 टक्के आरक्षण असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी आकडेवारीही संपूर्ण माहिती सादर केली. छगन भुजबळ यांनी मंत्रालयीन कर्मचाऱ्यांसंबंधी सादर केलेल्या आकडेवारीवर अजित पवारांनी आक्षेप घेतला.

# नार्वेकरांविरुद्ध सुप्रीम कोर्टात ॲफेडेव्हिट!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आमदार अपात्रताप्रकरणात शिवसेना ठाकरे गटाने जोरदार हालचाली सुरु केलेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात ॲफेडेव्हिट सादर केले आहे. आमदार अपात्रता प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाने हालचाली सुरु केलेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात ॲफेडेव्हिट सादर केले. विधानसभा अध्यक्षांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकावर ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे.

अपात्रता मुद्दा सोडून इतर विषयात अध्यक्ष वेळ घालवत आहेत, असा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. विधासभा अध्यक्षांनी जाहीर केलेलं वेळापत्रक आणि होणारा विलंब पाहता ठाकरे गट थेट सुप्रीम कोर्टात गेला आहे. याप्रकरणी आता 6 ऑक्टोबरला होणाऱ्या सुनावणीत मुद्दा मांडला जाणार आहे. हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात मांडू असे ठाकरे गटाचे नेते आणि माजी मंत्री अनिल परब म्हणाले होते. त्यानुसारच ॲफेडेव्हिट सादर करण्यात आले आहे. दरम्यान, राहुल नार्वेकर यांनी नुकतीच 25 सप्टेंबरला आमदार अपात्रतेप्रकरणी प्रत्यक्ष दुसरी सुनावणी घेतली. 14 सप्टेंबरला झालेल्या पहिल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी प्रकरणी दुसरी सुनावणी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडली.

ठाकरे गटाकडून सर्व दाखल 34 याचिका एकत्रित करून सुनावणी करा, अशी मागणी करण्यात आली. सर्व दाखल 34 याचिका एकत्रित का केल्या जात नाहीत? अशी विचारणा त्यांनी केली. मात्र, सर्व याचिकांची एकत्रित सुनावणीला शिंदे गटाच्या वकिलांकडून विरोध करण्यात आला. शिंदे गटाचे वकील अनिलसिह साखरे यांनी सर्व याचिका एकत्रित नको, स्वतंत्र सुनावणी घ्या, असा युक्तिवाद केला. आता या प्रकरणात पुढील सुनावणी 13 ऑक्टोबर रोजी होणार आहे.

# शिवाजी पार्कसाठी कोण मारणार बाजी?

## » मैदानासाठी एक महिन्याआधीच पालिकेकडे अर्ज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्यावर्षीप्रमाणे यंदाच्या दसरा मेळाव्यावरूनही शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गट एकमेकांससमोर आले होते. आपला दसरा मेळावा हा शिवाजी पार्कवरच व्हावा यासाठी दोन्ही गटाकडून महापालिकेला पत्रक देण्यात आले आहेत. पण परंपरेप्रमाणे यंदाही शिवसेना ठाकरे गटाचा मेळावा हा शिवाजी पार्कवरच होणार आणि त्यासाठी प्लॅनही तयार असल्याचे ठाकरे गटाकडून सांगण्यात आले.**

परंतू यंदा खरच शिवाजी पार्कवर कोण बाजी मारणार? दसरा मेळाव्यासाठी मैदान कोणाला भेटणार याकडे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. गेल्या वर्षी शिवाजी पार्कमध्ये दसरा मेळावा ठाकरे गटाकडून घेण्यात आला होता, यंदाही त्या ठिकाणी आमच्याच दसरा मेळाव्याल परवानगी मिळेल, त्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास ठाकरे गटाचे नेते महेश सावंत यांनी व्यक्त केला. आता महापालिकेला आम्ही पत्र दिलं आहे, त्यांचा निर्णय काय होतो याची वाट पाहू आणि त्यानंतर वरिष्ठ नेते भूमिका घेतील, असे त्यांनी सांगितले. शिवाजी पार्कवर यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गटाकडूनही परवानगी मागितली आहे. गेल्या वर्षीही यावरून वाद झाला होता आणि ठाकरे गटाने न्यायालयाची दारं धडकावली होती. त्यानंतर ठाकरे गटाचा मेळावा हा शिवाजी पार्कवर तर शिंदे गटाचा मेळावा हा बीकेसीमध्ये पार पडला होता. आताही दोन्ही गटांनी आपल्यालाच शिवाजी पार्क मिळावे, अशी मागणी करत महापालिकेकडे पत्र दिले आहे. ठाकरे गटाचे नेते महेश सावंत म्हणाले की, मागच्या वर्षी थाटामाटात आम्ही शिवाजी पार्क येथे दसरा मेळावा केला होता. मागच्या वर्षी शेवटपर्यंत मुंबई महापालिकेने आम्हाला शिवाजी पार्कसाठी परवानगी दिली नाही. त्यामुळे आम्ही न्यायालयात गेलो. मागच्या वर्षीचा न्यायालयाचा निकाल आमच्याकडे आहे. त्याची परवानगी आम्ही या वर्षीच्या पत्रात जोडली आहे. दीड महिन्यापूर्वीच आम्ही पत्र मुंबई महापालिकेला दिला आहे. त्यामुळे यावर्षी आम्हाला शिवाजी पार्क दसरा मेळाव्यासाठी मिळण्यासाठी काही अडचण येणार नाही असा विश्वास आहे. महेश सावंत पुढे म्हणाले की, शिंदे गटने शिवाजी पार्कसाठी पत्र दिलं आहे की नाही याची माहिती नाही. आम्ही वॉर्ड ऑफिसरला आता सुद्धा भेटून आलो. त्यांचा असं म्हणणं आहे की तुमचं पत्र आम्हाला प्राप्त झाल्यांनंतर आम्ही विधी विभागाला या संदर्भात मार्गदर्शनासाठी पाठवलं आहे. त्यामुळे त्यांचा निर्णय घेईल तोपर्यंत वाट बघू.



### सेनेच्या दोन्ही गटाकडून परवानगी

» शिवाजी पार्कवर यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गटाकडूनही परवानगी मागितली आहे. गेल्या वर्षीही यावरून वाद झाला होता आणि ठाकरे गटाने न्यायालयाची दारं धडकावली होती. त्यानंतर ठाकरे गटाचा मेळावा हा शिवाजी पार्कवर तर शिंदे गटाचा मेळावा हा बीकेसीमध्ये पार पडला होता. आताही दोन्ही गटांनी आपल्यालाच शिवाजी पार्क मिळावे, अशी मागणी करत महापालिकेकडे पत्र दिले आहे.

# शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार!

## पंजाबमध्ये दिल्ली-चंदीगड हायवे ठप्प; 90 रेल्वेंना फटका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंजाबमध्ये नुकसान भरपाई, एमएसपी आणि कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच आहे. संपूर्ण पंजाबमध्ये शेतकरी रेल्वे रुळांवर बसले आहेत. रेल्वे ट्रॅक ठप्प झाल्याने दिल्ली ते अमृतसर, पठाणकोट ते अमृतसर आणि पंजाब ते चंदिगड, जालंधर, लुधियाना ते मोगा, फिरोजपूर, फाजिल्का आदी सर्व मार्ग पूर्णपणे ठप्प झाले आहेत. 90 गाड्यांना याचा फटका बसला आहे.**



### 17 ठिकाणी शेतकरी रुळांवर बसले

रेल्वे जाम झाल्याने शेकडो प्रवासी पंजाबच्या रेल्वे स्थानकांवर अडकले आहेत. शुक्रवारी जवळपास 60 गाड्या प्रभावित झाल्या. शुक्रवारी 90 हून अधिक गाड्या प्रभावित झाल्या. त्यापैकी 80 हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. 19 गटांनी 17 ठिकाणी रेल्वे रुळ रोखले आहेत. यामध्ये मोगा रेल्वे स्टेशन, अजितवाल आणि डगरू, होशियारपूर, गुरदासपूर आणि डेरा बाबा नानक, जालंधर कँट, तरनतारन, संगरूरचे सुनम, पटियालाचे नाभा, फिरोजपूरचे बस्ती टंकनवाली आणि मल्लनवाला, भटिंडाचे रामपुरा फूल, देविदासपुरा आणि मजिठा, अमृतसर यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांनी दिल्ली-चंदीगड राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला आहे. मोहालीच्या लालडूमध्ये चंदीगडहून अंबालाकडे जाणाऱ्या महामार्गावर शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन केले आहे. यावेळी शेतकरी आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाली, त्यानंतर शेतकरी संतप्त झाले. पंजाबमध्ये गुरुवारपासून 19 शेतकरी-कामगार संघटना आंदोलन करत आहेत. रेल्वे जाम झाल्याने शेकडो प्रवासी पंजाबच्या रेल्वे स्थानकांवर अडकले आहेत. शुक्रवारी जवळपास 60 गाड्या प्रभावित झाल्या. शुक्रवारी 90 हून अधिक गाड्या प्रभावित झाल्या. त्यापैकी 80 हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. 19 गटांनी 17 ठिकाणी रेल्वे रुळ रोखले आहेत. यामध्ये मोगा रेल्वे स्टेशन, अजितवाल आणि डगरू, होशियारपूर, गुरदासपूर आणि डेरा बाबा नानक, जालंधर कँट, तरनतारन, संगरूरचे सुनम, पटियालाचे नाभा, फिरोजपूरचे बस्ती टंकनवाली आणि मल्लनवाला, भटिंडाचे रामपुरा फूल, देविदासपुरा आणि मजिठा, अमृतसर यांचा समावेश आहे. फाजिल्का. अहमदगड, मालेरकोटला येथे 30 सप्टेंबरपर्यंत हे निदर्शने सुरू राहणार आहेत. पूर आणि पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. अनेक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे ना सर्वेक्षण झाले ना त्यांना नुकसान भरपाई मिळाली. ज्यांना मिळाले ते फार कमी आहेत. शेतकऱ्यांना एकरी किमान 50 हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, असे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे. याशिवाय केंद्र सरकारनेही पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी पंजाबला 50 हजार कोटी रुपये द्यावेत.

# इंटरनेट बंदी हा समस्येवरचा उपाय नाही!

## मणिपूरमध्ये मौन धरणे: विद्यार्थ्यांच्या हातात फलक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दोन बेपत्ता विद्यार्थ्यांच्या हत्येप्रकरणी मणिपूरमध्ये चार दिवसांपासून निदर्शने सुरू आहेत. शुक्रवारी केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीही मूक आंदोलन केले. त्या सर्वांनी फलक घेतले होते ज्यावर लिहिले होते - इंटरनेट बंदी हा मणिपूर समस्येवर उपाय नाही. दुसरीकडे, इंफाळमधील भाजप कार्यालयावर मोठा हल्ला होण्याची शक्यता लक्षात घेता, जलद कृती दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दल तैनात करण्यात आले आहे.**



### सीआरपीएफचे 40 जवान शहीद

हिंसाचाराच्या दरम्यान, त्याला पालक केडर मणिपूरमध्ये पाठवण्यात आले आहे. श्रीनगर एसएसपी म्हणून कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राकेश यांनी साडेतीन वर्षे एनआयएमध्ये एसपी म्हणून काम केले. 2019 च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याचा तपास करणाऱ्या टीमचे ते सदस्य होते. या हल्ल्यात सीआरपीएफचे 40 जवान शहीद झाले.

शुक्रवारी सकाळी, आवश्यक वस्तू आणि औषधे खरेदी करण्यासाठी इंफाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये सकाळी 5 ते रात्री 11 वाजेपर्यंत कर्फ्यू शिथिल करण्यात आला होता, परंतु गर्दी जमण्यास मनाई होती. मोठा हल्ला होण्याची शक्यता पाहता इंफाळमधील भाजप कार्यालयाबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. येथे सीआरपीएफ आणि आरएएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. 27 सप्टेंबर रोजी थौबल जिल्ह्यातील भाजप कार्यालयाला जमावाने आग लावली होती. याशिवाय इंफाळमध्ये भाजप अध्यक्षा शारदा देवी यांच्या घराचीही तोडफोड करण्यात आली. गुरुवारी संतप्त जमावाने मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांच्या खाजगी घरावर हल्ला करण्यासाठी इंफाळ गाठले. मात्र, पोलिसांनी त्यांना घराच्या 500 मीटर आधी अडवले. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून त्यांना हुसकावून लावले. सध्या मुख्यमंत्र्यांच्या घराची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. याआधी बुधवारी आंदोलकांनी थोबुल जिल्ह्यातील भाजप कार्यालयाला आग लावली. दुसरीकडे, इंफाळमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष शारदा देवी यांच्या घरावरही हल्ला करण्यात आला. याशिवाय इंफाळ पश्चिम येथील उपजिल्हाधिकाऱ्यांच्या घराची जाळपोळ करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या भागात हिंसाचार उसळला आहे त्या भागांना मणिपूर सरकारने 'शांततापूर्ण क्षेत्र' घोषित केले आहे. गुरुवारी इंफाळ पश्चिम जिल्ह्यातील टेरा येथील मृत विद्यार्थ्यांच्या घराजवळ हजारो लोकांनी निदर्शने केली. विद्यार्थ्यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करावी, अशी त्यांची मागणी आहे. त्याच वेळी, पीडित मुलीच्या काकूने दैनिक भास्करला सांगितले की, त्यांना फक्त मुलांचे मृतदेह हवे आहेत जेणेकरून ते त्यांचे अंत्य संस्कार करू शकतील.

# मनेका गांधींना 100 कोटींची मानहानीची नोटीस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा चेतना (इस्कॉन) ने शुक्रवार, 29 सप्टेंबर रोजी भाजप खासदार मनेका गांधी यांना 100 कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवली आहे. नुकताच मनेकांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यामध्ये त्या म्हणत आहेत की, इस्कॉन आपल्या गायी कसायांना विकते. सध्या भारतातील सर्वात मोठा फसवणूक करणारा इस्कॉन आहे. इस्कॉनचे उपाध्यक्ष राधारमण दास म्हणाले की, इस्कॉनवरील आरोप पूर्णपणे निराधार आहेत. या आरोपांबाबत आम्ही मनेका गांधी यांना नोटीस पाठवली आहे. मेनका यांच्या आरोपामुळे इस्कॉनचे भक्त, समर्थक आणि हितचिंतक अतिशय दुःखी झाले आहेत. मनेका यांचे आरोप दुर्भावनापूर्ण आहेत. माजी केंद्रीय मंत्री मनेका यांनी सांगितले होते की, इस्कॉनने गायींचे आश्रयस्थान स्थापन केले होते, जे चालवण्यासाठी त्यांना सरकारकडून अगणित लाभ मिळतात. त्यांना मोठ्या जमिनी मिळतात. असे असतानाही ज्या गायी दूध देत नाहीत त्या कसायाच्या ताब्यात दिल्या जातात. त्यांच्या गोठ्यात एक वासरू किंवा एकही कोरडी (म्हातारी) गाय नाही. मनेकांनी एका यूट्यूबरला दिलेल्या मुलाखतीत या गोष्टी सांगितल्या होत्या. त्यांनी सांगितले की, मी आंध्र प्रदेशातील अनंतपूर येथील इस्कॉनच्या गायींच्या आश्रमात गेले होते. गोठ्यात एकही गाय सापडली नाही जिने दूध दिले नाही. तसेच एकही बछडा सापडला नाही. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की ते (इस्कॉन) दूध न देणाऱ्या गायी आणि वासरे विकतात. मेनका गांधी म्हणाल्या की, इस्कॉन कसाईंना गायी विकत आहे. ते जसे करतात तसे दुसरे कोणीही करत नाही. ते रस्त्यावर 'हरे राम हरे कृष्ण' गातात. मग त्यांचे संपूर्ण आयुष्य दुधावर अवलंबून असल्याचे सांगतात. कदाचित, इस्कॉनने जितकी गुरे कसायाला विकली असतील तितकी कोणीही विकली नसेल. जर हे लोक हे करू शकत असतील तर आपण इतरांकडून काय अपेक्षा करू शकतो.

# वर्ल्ड रेकॉर्ड फॉलोअर्सचा कतरिनाच्या नावावर!

अगदी काहीच दिवसांपूर्वी व्हॉट्सअ‍ॅप चॅनल हे नवीन फिचर व्हॉट्सअ‍ॅपवर समाविष्ट झालंय. या फिचर अंतर्गत असंख्य माध्यमांनी, सेलिब्रिटींनी स्वतःचं चॅनल उघडलं आहे. या चॅनलच्या माध्यमातुन आता असंख्य सेलिब्रिटी त्यांच्या आयुष्याबद्दलचे अपडेट्स शेअर करत असतात. अशातच अभिनेत्री कतरिना कैफने व्हॉट्सअ‍ॅप चॅनलवर उघडताच नवा रेकॉर्ड तिच्या नावावर केलाय. जाणुन घ्या सविस्तर. कतरीनाने व्हॉट्सअ‍ॅप चॅनल उघडताच तिचे 15.3 मिलियन फॉलोअर्स झाले. त्यामुळे कतरिना कैफ व्हॉट्सअ‍ॅप चॅनलची सर्वाधिक फॉलोअर्स असलेली अभिनेत्री ठरली. बॉलिवूड स्टार कैटरीना कैफने व्हॉट्सअ‍ॅप चॅनलवर एक उल्लेखनीय म्हणजेच 15 मिलीयन फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला आहे. असा रेकॉर्ड करणारी आणि व्हॉट्सअ‍ॅप चॅनलवर सर्वाधिक फॉलो केली जाणारी कतरिना सेलिबिटी ठरली आहे. अगदी व्हॉट्सअ‍ॅप कंपनीचे मालक मार्क झुकरबर्ग आणि गायक/रॅपर बॅड बनी यासारख्या जागतिक व्यक्तींना तिने मागे यात मागे



टाकलंय. बॉलीवूडमध्ये तिच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या कतरीना कैफने केवळ तिच्या अभिनयाने लाखो लोकांची मने जिंकली नाहीत तर तिच्या यशस्वी उद्योजकतेमध्येही ती कायमच एक पाऊल पुढे असते. व्हॉट्सअ‍ॅप चॅनलसाठी झालेले कतरिनाचे फॉलोअर्स हे तिचं किती फॅन फॉलोईंग आहे याचं उदाहरण म्हणून बघता येईल. कैटरीना ही ब्रँड्समध्ये प्रसिद्ध झाली असून अलीकडेच कतार

# रिचानं बॉलीवूडवर साधला निशाणा



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री रिचा चड्ढा ही तिच्या आक्रमक वक्तव्यासाठी ओळखली जाणारी सेलिब्रेटी आहे. गेल्या काही दिवसांपासून ती तिच्या परखड बोलण्यामुळे चर्चेत आली आहे. आता तिचा फुकरे ३ नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. त्याच्या प्रमोशनच्या दरम्यान तिनं केलेला खुलासा हा भलताच धक्कादायक आहे. फुकरे च्या अगोदरच्या चित्रपटांना देखील प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यानं बॉक्स ऑफिसवर समाधानकारक कमाईही केली होती. मृगदीप सिन्हा यांनी दिग्दर्शित केलेल्या फुकरे च्या तिसऱ्या पार्टची प्रेक्षकांना गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षा होती.

रिचा चड्ढा,पंकज त्रिपाठी, पुलकित सम्राट या कलाकारांची जुगलबंदी या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. सोशल मीडियावर या चित्रपटाचा ट्रेलर, त्याचे बीटीएस विशेष लोकप्रिय होताना दिसत आहेत. त्यावर नेटकऱ्यांच्या आलेल्या कमेंट्स देखील भन्नाट आहेत. यासगळ्यात चित्रपटाचे प्रमोशन करण्यात व्यस्त असलेल्या रिचानं बॉलीवूडमधील त्या प्रकारावर सडेतोडपणे भाष्य केले आहे. ज्यामुळे पुन्हा नवा वाद तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नाकाच्या सर्जरीमुळे प्रियांकाचा चेहरा झाला होता विद्रूप

'गदर 2' चित्रपटाचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी प्रियांका चोप्राच्या करिअरबद्दल सांगितले आहे. प्रियांकाने त्यांच्या 'द हीरो: लव्ह स्टोरी ऑफ अ स्पाय' या चित्रपटात काम केले होते. 2003 मध्ये रिलीज झालेला हा चित्रपट प्रियांकाचा पहिला बॉलिवूड चित्रपट होता. अनिल शर्मांने एका मुलाखतीत सांगितले की, प्रियांका चित्रपटसृष्टी सोडण्याच्या मार्गावर होती कारण त्या काळात तिला अनेक चित्रपटांमधून काढून टाकण्यात आले होते. याचे कारण होते प्रियांका चोप्राची प्लास्टिक सर्जरी. वास्तविक, हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी प्रियांकाने तिच्या नाकावर शस्त्रक्रिया करून घेतली होती ज्यामुळे तिचे करिअर सुरू होण्यापूर्वीच संपुष्टात आले असते. अनिल शर्मा यांनी बॉलीवूड ठिकानाशी संवाद साधताना सांगितले की, प्रियंकासोबत मोठी दुर्घटना घडली. ती छान दिसत होती, मी तिला चित्रपटात साइन केले. माझ्या पत्नीने



स्वतः तिला मंदिराबाहेर साइनिंग अमाउंट दिली होती. त्यानंतर गदर चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मी अमेरिका आणि युरोपला गेलो. जेव्हा मी दोन महिन्यांनी परत आलो तेव्हा मला दिसले की प्रियांकाने तिच्या नाकाची शस्त्रक्रिया करून घेतली कारण तिला ज्युलिया रॉबर्टससारखे दिसायचे होते. हे मी वर्तमानपत्रात वाचले. माझ्या मनात विचार आला, प्रियांकाला असे करण्याची काय गरज होती, ती तशी सुंदर दिसत होती. अनिल शर्मा पुढे म्हणाले, काही दिवसांनी एका निर्मात्याने मला प्रियांकाचा शस्त्रक्रियेनंतरचा फोटो दाखवला. मी तिला अजिबात ओळखू शकलो नाही आणि विचारले - ही कोणती नायिका आहे? तो म्हणाला- प्रियांका. मी थक्क झालो. तिचा चेहरा पूर्णपणे काळा झाला होता, मला वाटले प्रियांकाने स्वतःचे काय केले? दुसऱ्या दिवशी मी प्रियांकाला भेटायला बोलावलं. ती आईसोबत मला भेटायला आली. प्रियांका आणि तिची आई रडत होती. प्रियांकाच्या नाकावर एक डाग पडलेल्या ऑपरेशनबद्दल तिने मला सांगितले. ती खूण अजूनही आहे. प्रियांकाने सांगितले की तिला बरे होण्यासाठी काही महिने लागतील त्यामुळे तिला अनेक प्रोजेक्ट्समधून काढून टाकण्यात आले आहे. मी प्रियांकाला विचारले- तू असे का केलेस? प्रियांकाने सांगितले की, ती सायनसच्या समस्येने त्रस्त होती जी तिच्यासाठी असह्य झाली होती. शस्त्रक्रिया चुक झाल्यामुळे प्रियंका इतकी नाराज झाली होती की तिने बरेलीला परत जाण्याचा निर्णय घेतला होता. अनिल शर्मांने प्रियांकाला कठीण काळात साथ दिली. यशराज फिल्म्समध्ये काम करणाऱ्या एका दिग्गज मेकअप आर्टिस्टला फोन केला. त्या आर्टिस्टने माधुरी आणि श्रीदेवीसोबत होते.

त्यांनी मेकअप दीक्षित काम केले

# डान्स करत नवरदेवाकडे गेली परिणीती चोप्रा

राघव-परिणितीच्या लग्नाची एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये परिणीती राघवकडे पाहत त्यांच्याकडे जात आहे. परिणीतीचे भाऊ तिच्या जवळ येताच ती डान्स करायला लागते. आणि नंतर डान्स करत राघवकडे जाताना दिसत आहे. यादरम्यान राघवने परिणीतीच्या कपाळाचे चुंबन घेतले. राघव-नीती त्यांच्या ड्रीमी मोमेंटचा आनंद घेत आहेत. परिणीतीने नुकताच तिच्या सोशल मीडियावर एक किस्सा शेअर केला आहे. आजीची आठवण करून तिने लिहिले - माझ्या खास दिवशी तुझी अनुपस्थिती मला जाणवली.



चावीचा आयकॉन बनवून तुझा तुकडा माझ्याकडे असल्याचेही तिने सांगितले. तसेच सोशल मीडियावर लोकांना धन्यवाद असे लिहिले. लग्नानंतर परिणीती राघव यांच्यासोबत दिल्लीत आहे. तीन दिवसांपूर्वी आप खासदार राघव चड्ढा आणि बॉलिवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा उदयपूरच्या हॉटेल लीला पॅलेसमध्ये विवाह झाला. पिचोला तलावाच्या मध्यभागी असलेल्या ताज लेक पॅलेस येथून लग्नाची मिरवणूक हॉटेल लीला येथे पोहोचली. या लग्नाला अनेक राजकारणी, फॅशन डिझायनर आणि दोघांचे नातेवाईक आणि मित्रांनीही हजेरी लावली होती.

# ईशाने नवव्या वर्षी उचलली बंदूक!

## » 4 पदकं जिंकून ईशाने वडिलांच्या कष्टाचं चीज केलं

**नवी दिल्ली । महाईन्यूज। वृत्तसंस्था**

**टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंची कामगिरी जेमतेम होती. त्या अपयशातून सावरलेल्या भारतीय खेळाडूंनी आशियाई क्रीडा स्पर्धेत पदकांची रांग लावली आहे. प्रामुख्याने भारतीय नेमबाजांनी त्यांच्या नावाला साजेशी कामगिरी केली आहे. भारतीय खेळाडू आशियाई क्रीडा स्पर्धेत दररोज किमान पाच ते सहा पदकं पटकावत आहेत.**

यावर्षीच्या स्पर्धेत पदक विजेत्या खेळाडूंच्या यादीत अनेक नवीन नावं पाहायला मिळत आहेत. यामध्ये एक खेळाडू अशी आहे जी अवघी १८ वर्षांची आहे. परंतु, तिच्याकडे पाहिलं तर 'मूर्ती लहान पण किर्ती महान' हा वाक्प्रचार आठवतो. कारण ईशाने आशियाई क्रीडा स्पर्धेत मोठी कामगिरी केली आहे. या स्पर्धेत तिने एकटीने चार पदकांवर आपलं नाव कोरलं आहे. ईशाने १० मीटर एअर पिस्तूल महिला सांघिक स्पर्धेत रौप्य पदक, १० मीटर एअर पिस्तूल महिला वैयक्तिक स्पर्धेत रौप्य पदक पटकावलं आहे. तत्पूर्वी तिने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल सांघिक स्पर्धेत सुवर्ण आणि वैयक्तिक २५ मीटर पिस्तूल प्रकारात रौप्य पदक पटकावलं आहे. एक सुवर्ण आणि तीन रौप्य पदकांसह तिने एकटीने चार पदकं पटकावली आहेत.

वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी पहिल्यांदा रायफल उचणाऱ्या ईशाचा आजवरचा प्रवास थक्क करणारा आहे. ईशा ही नवव्या वर्षी तिचे वडील सचिन यांच्याबरोबर पहिल्यांदा शूटिंग (नेमबाजी) रेंजवर गेली होती. तिथेच तिने पहिल्यांदा बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज ऐकला होता. त्यानंतर तिलाही बंदुकीने नेमबाजी कराविशी वाटली. त्यामुळे ती रायफल उचलायला गेली आणि जमिनीवर पडली. त्यानंतर तिच्या आई-वडिलांनी तिला शॉटगन भेट दिली. ईशाचा नेमबाजीतला रस पाहून तिच्या पालकांनी तिला त्यासाठी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. हळूहळू ईशा नेमबाजी शिकू लागली. तसेच ती वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये नेमबाजी करू लागली. त्यानंतर ती राज्य स्तरावरील स्पर्धा जिंकू लागली. ईशा ही २०१८ साली झालेल्या राष्ट्रीय चॅम्पियनशिपच्या वेळी पहिल्यांदा प्रकाशझोतात आली. त्यावेळी तिने हीना सिद्धू आणि मनू भाकर या दोन नावाजलेल्या नेमबाजांना पराभूत करून सुवर्णपदक पटकावलं होतं. तेव्हा ईशा केवळ १३ वर्षांची होती. तसेच त्या स्पर्धेतील सर्वात लहान सुवर्णपदक विजेती खेळाडू ठरली होती. ईशाचे वडील रॅली ड्रायव्हर होते. आपल्या मुलीनेही खेळात मोठं नाव कमवावं असं त्यांना वाटत होतं. त्यामुळे त्यांनी मुलीच्या स्वप्नांना पंख देण्याचं काम केलं. त्यांनी स्वतःच्या करिअरला बाजूला सारून मुलीच्या खेळावर लक्ष केंद्रीत केलं. मुलीला प्रत्येक स्पर्धेत जाण्यासाठी तिच्याबरोबर कोणीतरी हवं होतं. त्यामुळे त्यांनी रॅली ड्रायव्हिंग सोडून दिलं. त्यांनी ईशासाठी फीजिओ आणि मानसशास्त्रज्ञाचीदेखील नेमणूक केली आहे.



### 13 व्या वर्षी बनली नॅशनल चॅम्पियन

» ईशाचा नेमबाजीतला रस पाहून तिच्या पालकांनी तिला त्यासाठी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. हळूहळू ईशा नेमबाजी शिकू लागली. तसेच ती वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये नेमबाजी करू लागली. त्यानंतर ती राज्य स्तरावरील स्पर्धा जिंकू लागली. ईशा ही २०१८ साली झालेल्या राष्ट्रीय चॅम्पियनशिपच्या वेळी पहिल्यांदा प्रकाशझोतात आली. त्यावेळी तिने हीना सिद्धू आणि मनू भाकर या दोन नावाजलेल्या नेमबाजांना पराभूत करून सुवर्णपदक पटकावलं होतं. तेव्हा ईशा केवळ १३ वर्षांची होती. तसेच त्या स्पर्धेतील सर्वात लहान सुवर्णपदक विजेती खेळाडू ठरली होती.

# विश्वचषकात रोहित रचणार इतिहास!

## » मोडणार सचिन तेंडुलकरचा 'हा' मोठा विक्रम

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघ एकदिवसीय विश्वचषकात इतर संघांशी सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज दिसत आहे. भारतीय संघ ८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे पाच वेळचा चॅम्पियन ऑस्ट्रेलियाविरुद्ध विश्वचषक स्पर्धेच्या १३व्या हंगामात आपल्या मोहिमेची सुरुवात करेल.**

या विश्वचषकापूर्वी रोहित शर्मा जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे आणि पुन्हा एकदा त्याच्या देशात गेल्या विश्वचषकातील म्हणजेच २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती होईल अशी अपेक्षा आहे. गेल्या विश्वचषकात रोहितने ५ शतकांसह सर्वाधिक धावा केल्या होत्या आणि तो सचिन तेंडुलकरचा एक मोठा विक्रम मोडण्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे. एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांबद्दल बोलायचे झाले, तर रोहित शर्मा आणि सचिन तेंडुलकर संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर आहेत. या दोन्ही फलंदाजांनी एकदिवसीय विश्वचषकात आतापर्यंत सर्वाधिक ६-६ शतके झळकावली आहेत, परंतु रोहित शर्मने या विश्वचषकात शतक झळकावताच तो एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा फलंदाज बनेल. तसेच सचिन तेंडुलकर दुसऱ्या क्रमांकावर येईल. रोहित शर्माने एकदिवसीय विश्वचषकात आतापर्यंत १७ सामन्यांच्या १७ डावांमध्ये ६ शतकांसह ९७८ धावा केल्या आहेत. रोहित शर्मने या सामन्यांमध्ये ६५.२० च्या सरासरीने धावा केल्या आहेत. तसेच एकदिवसीय विश्वचषकातील त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम धावसंख्या १४० धावा आहे. या सामन्यांमध्ये त्याने १०० चौकार आणि २३ षटकार मारले आहेत. सचिन तेंडुलकरबद्दल बोलायचे, तर त्याने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत ४५ सामन्यांच्या ४४ डावांमध्ये ६ शतकांसह २२७८ धावा केल्या आहेत, यामध्ये त्याची सर्वोत्तम धावसंख्या १५२ धावा आहे.



### शतक झळकावताच मोडणार

» विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांबद्दल बोलायचे झाले, तर रोहित शर्मा आणि सचिन तेंडुलकर संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर आहेत. या दोन्ही फलंदाजांनी एकदिवसीय विश्वचषकात आतापर्यंत सर्वाधिक ६-६ शतके झळकावली आहेत, परंतु रोहित शर्मने या विश्वचषकात शतक झळकावताच तो एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा फलंदाज बनेल. तसेच सचिन तेंडुलकर दुसऱ्या क्रमांकावर येईल.

# गुणतिलका बलात्कार प्रकरणात निर्दोष!

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियात दाखल झालेल्या बलात्कार प्रकरणात श्रीलंकेचा क्रिकेटपटू दनुष्का गुणतिलका निर्दोष असल्याचे समोर आले आहे. सिडनी कोर्टाने गुणतिलकावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आता तब्बल 11 महिन्यांनंतर हा क्रिकेटर श्रीलंकेत परतणार आहे. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियात झालेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान या बलात्कार प्रकरणात गुणतिलकाला अटक करण्यात आली होती. क्लीन चिट मिळाल्यानंतर गुणतिलका मीडियाला म्हणाले- हे 11 महिने माझ्यासाठी खूप कठीण होते. आज मी आनंदी आहे, जीवन पुन्हा सामान्य झाले आहे. श्रीलंकेत परतण्याची आणि पुन्हा मैदानात उतरण्याची मी आतुरतेने वाट पाहत आहे. 2022 मधील ऑस्ट्रेलिया टी-20 विश्वचषकातील इंग्लंड-श्रीलंका सामन्यानंतर 6 नोव्हेंबरला सकाळी सिडनीतील सांघिक हॉटेलमधून दानुष्काला पोलिसांनी अटक केली होती. 29 वर्षीय महिलेसोबत तिच्या संमतीशिवाय शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप त्याच्यावर होता. गुणतिलकाच्या विरोधात 4 कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यातील एक कलम बलात्काराशी संबंधितही होते. त्याला ६ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियन न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर कोर्टाने म्हटले होते - जोपर्यंत तपास सुरू तोपर्यंत तो ऑस्ट्रेलिया सोडू शकणार नाही. गुणतिलकाही 11 दिवस पोलिस कोठडीत होते. 1.2 कोटींचा दंड भरल्यानंतर जामीन मिळाला. ऑस्ट्रेलियात त्याच्या अटकेनंतर, गुणतिलकाला श्रीलंका क्रिकेट बोर्डाने निलंबित केले आणि कोणत्याही प्रकारात भाग घेण्यास बंदी घातली.